Rediffusion/Edelman

**Publication:** Maharashtra Times
**Date:** 28/08/2013
**Edition:** Pune
**Page No:** 8
**Headline:** IT Quiz in Full Swing

# रंगली आयटी क्विझ

## टाटा कन्सल्टन्सी आयोजित स्पर्धेत 'फर्ग्युसन' विजयी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



आयटीमधील संकल्पना, तंत्रज्ञान, आयटीमधील प्रसिद्ध व्यक्ती, ॲप्लिकेशन्स आणि सॉफ्टवेअर्स, हार्डवेअर टूल्स असे इन्फोर्मेशन टेक्नोलॉजीच्या संदर्भातील विविध प्रश्न आणि त्याची अचूक उत्तरे देणारे विद्यार्थी.. अशी स्पर्धा मंगळवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रंगली होती.

निमित्त होते टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित 'आयटी विझ २०१३' या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे. या फेरीत फर्ग्युसन ज्युनिअर कॉलेजच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत पुण्यातील सुमारे ११०० विद्यार्थी सहभागी झाले होते. फर्ग्युसनच्या टीममध्ये दिविज घोष आणि सुप्रीत रवीश या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विजेत्यांना एक आयपॅड देण्यात आले. डॉ. श्यामराव कलमाडी हायस्कूलच्या धनंजय काटकर आणि आयुष यांबरवार या विद्यार्थ्यांच्या टीमने द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांना गॅलॅक्सी टॅब देण्यात आला. तर गुरुकुल स्कूलच्या अथर्व प्रभुणे आणि सौरव महाले यांच्या टीमने तृतीय क्रमांक पटकावला. बार्कलेज टेक्नोलॉजी सेंटरचे प्रमुख इग्नाशिओ व्हेरा आणि टीसीएसच्या पुणे डिलिव्हरी सेंटरचे प्रमुख अरविंद पाध्ये यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

'या स्पर्धेसाठी सामान्य ज्ञानासाठीच्या वेबसाइट्सबरोबरच फेसबुकवरील क्विझशी संबंधित ग्रुपमधूनही खूप चांगली माहिती मिळाली,' असे दिविज आणि सुप्रीत यांनी सांगितले.

'गुगल आणि विकिपीडिया या वेबसाइट्सवरुन आम्हाला खूप माहिती मिळाली. विविध कंपन्या, त्यांचे संचालक आणि त्यांचे प्रॉडक्ट्स याची माहिती आम्ही त्यावरुन मिळवली,' असे धनंजय आणि आयुष यांनी सांगितले.

'शिक्षकांच्या मार्गदर्शनाबरोबरच लायब्ररीमधील सामान्य ज्ञानाची आणि कम्प्युटर्सशी संबंधित पुस्तके आणि विविध वेबसाइट्सचाही आम्हाला फायदा झाला,' असे अथर्व आणि सौरव यांनी सांगितले.